# 'मेट्रो ३'च्या एका गाडीत २५०० प्रवासी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

भुयारी मार्गामुळे मुंबईकरांचे आकर्षण ठरलेल्या 'मेट्रो ३'ची प्रवासी क्षमता सध्या सुरू असलेल्या इतर मेट्रो गाड्यांपेक्षा अधिक असणार आहे. ' मेट्रो ३' गाडी ८ डब्यांची असून यात एका वेळी २ हजार ५०० प्रवासी वाहून नेण्याची क्षमता असेल.

महिन्याभरापूर्वी मेट्रो ३ची आरडीएसओ चाचणी पूर्ण झाली. त्यानंतर लवकरच सीएमआरएस चाचणी पूर्ण होऊन भुयारी मेट्रो सुरू होईल अशी आशा होती; मात्र ती फोल ठरली. अद्याप मेट्रो सुरू होण्याची आशा नसली तरी तिच्या क्षमतेबद्दलची माहिती समोर आली आहे. मेट्रो ३ च्या सर्व गाड्या प्रत्येकी ८ डब्यांच्या आहेत. प्रत्येक गाडीत बसलेले आणि उभे असे साधारण २ हजार ५०० प्रवासी एका वेळी प्रवास करू शकतात.



कफ परेड ते आरेपर्यंत अशी ३३.५ किमीची मेट्रो ३ मार्गिका आहे. यावर २७ स्थानके आहेत. ही मार्गिका बीकेसी, विमानतळ टर्मिनल १ आणि टर्मिनल २, वरळी, दादर, सिद्धिविनायक, सीएसएमटी, चर्चगेट, हुतात्मा चौक आणि विधान भवन यांसारख्या शहरातील प्रमुख ठिकाणांना जोडते. सतत वर्दळीच्या असणार्या या ठिकाणांहून मेट्रो ३ला चांगला प्रतिसाद मिळणे अपेक्षित आहे. मात्र सीएमआरएस चाचणी होत नसल्याने प्रवासी नाराज आहेत. ही चाचणी यशस्वी झाल्यास आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा सुरू होणार आहे.